मानव संसाधन
अपडेट

# अनुकंपा तत्वावर १३३७ जणांना नोक-या
# ५८१ कनिष्ठ अभियंत्यांची नव्याने भरती

ऑगस्ट २००८ ते जानेवारी २००९ या सहा महिन्यांच्या काळात महावितरणने एकूण १३३७ उमेदवारांना अनुकंपा तत्वावर आपल्या सेवेत सामावून घेतले असून ५८१ कनिष्ठ अभियंत्यांची नव्याने भरती केली आहे.

अनुकंपावरील १३३७ पैकी ८१६ जणांना कनिष्ठ तंत्रज्ञ म्हणून, ५१७ जणांना कनिष्ठ लिपिक/कार्यालयीन सहाय्यक म्हणून तर ४ जणांना कारागीर (क) / मीटर वाचक म्हणून नियुक्त्या देण्यात आल्या आहेत. याशिवाय मृत कामगारांच्या ८५० अवलंबितांना आयटीआय प्रशिक्षणासाठी पाठविण्यात आले असून त्यानंतर त्यांनाही नेमणुका देण्यात येणार आहेत. ५८१ नव्या कनिष्ठ अभियंत्यांपैकी १८० अभियंत्यांना सेवा प्रवेश पूर्व प्रशिक्षणासाठी पाठविण्यात आले. मोठ्या प्रमाणावर अभियंत्यांच्या नेमणुका झाल्यामुळे अभियंत्यांची पदे रिक्त असल्यामुळे होणारी गैरसोय संपुष्टात आली आहे.

प्रशिक्षणाच्या माध्यमातून कार्यक्षमता वाढीस लागावी या हेतूने कामगार, अधिकारी व अभियंते यांना मोठ्याप्रमाणावर प्रशिक्षण देण्याचे काम कंपनीच्या मानव संसाधन विभागाने हाती घेतले आहे. दि. २१ ते २३ जानेवारी २००९ दरम्यान हैद्राबाद येथील राष्ट्रीय उत्पादकता परिषदेद्वारा संवाद कौशल्य, प्रेरणा आणि आत्मबल विकास (**Communication Skill, Motivation & Morale Development**) या विषयांवर प्रशिक्षण देण्यात आले. तांत्रिक, आस्थापना आणि लेखा विभागांतील ३२ अधिका-यांना त्याचा लाभ घेतला. तसेच सरळ सेवा भरतीद्वारे नियुक्त झालेल्या २८ कार्यकारी अभियंत्यांना मागील २९ व ३० जानेवारी रोजी प्रकाशगड येथे प्रशिक्षण देण्यात आले. मंडळ स्तरावर २५ लघु प्रशिक्षण केंद्रे कार्यरत असून त्याद्वारा तंत्रज्ञांसाठी तीन दिवसीय कार्यशाळा आयोजित करण्यात येत आहेत.